| | |
|---|---|
| MHST070023432026 | **<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १४१/२०२६ निशाणी १ वरील आदेश</u>**<br>( अश्वीनी महादेव कोकीतकर वि. महाराष्ट्र शासन )<br>(आदेश पारीत दि. ०९.०६.२०२६) |

अर्जदार अश्वीनी महादेव कोकीतकर यांनी सदरचा अर्ज हा कराड शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२५/२०२६ मधील जप्त मुद्देमाल म्हणजेच stallion कंपनीचे made in India भारतीय बनावटीचे ३२ रिव्हल्वर IN AHT 1 24 RL 01811 हे परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सदरचा मुद्देमाल हा तिचे मालकीचा आहे. ३२ रिव्हल्वर IN AHT 1 24 RL 01811 हे कराड शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२५/२०२६ मध्ये जप्त आहे. सदर रिव्हल्वर हे कराड शहर पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात राहील्यास ते खराब होण्याची दाट शक्यता असल्याने त्यांना तो परत द्यावा, अशी अर्जदाराने विनंती केली आहे. अर्जदाराने त्याचे शपथपत्र दाखल केले आहे. सबब, सदरचा मुद्देमाल परत करण्याची विनंती केली आहे.

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जावर दाखल करुन, मुद्देमाल संदर्भात अर्जदार यांनी शस्त्र परवाना असलेबाबत कागदपत्रे सादर केलेचे तपासी अधिकारी यांचे म्हणण्यावरुन दिसून येते. सबब कागदपत्रांची शहानिशा करुन योग्य ते आदेश पारित करणेची विनंती केली आहे.

४. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जावर दाखल करुन, अर्जदार यांनी जप्त मुद्देमालाबाबत परवाना असलेबाबत कागदपत्रे सादर केलेली आहेत परंतु, परवाना पडताळणीबाबतचा अंतिम अहवाल अदयाप प्राप्त झालेला नसल्याचे तसेच अर्जदार व आरोपी क्र. १ यांनी शस्त्र अधिनियम कायदयातील कलम २९ व ३० मधील शस्त्र परवाना अनुषंगाने अनियमितता केल्याचे दिसून येते असल्याचे नमुद केले आहे. सबब, जप्त मुद्देमालाबाबत योग्य ते आदेश पारित करणेची विनंती त्यांनी केली आहे.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखांचे अवलोकन केले.

५. सदर प्रकरणातील अर्जदाराने दाखल केलेल्या रिव्हल्वर परवान्याची पडताळणी प्रतीवरुन रिव्हल्वर ही अर्जदाराच्या मालकीची असल्याचे दिसून येते. तसेच, अर्जदाराने त्याचे आधारकार्ड तसेच

वैदयकिय व्यवसायाचे ओळखपत्राची पडताळीत प्रत दाखल केली आहे. त्यामुळे जप्त मुद्देमालावर अर्जदाराची प्रथमदर्शनी मालकी दिसून येते. तसेच अर्जदाराने एफ.आय.आर.ची प्रत दाखल केली असून प्रस्तुत गुन्हयात अर्जदार व अतुल नामदेव कल्याणकर हे आरोपी असून त्यांच्या ताब्यातून प्रस्तुतचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. अर्जदाराशिवाय इतर कोणीही सदरचे जप्त मुद्देमालाबाबत मालकी हक्काचा दावा केलेला नाही अगर त्याचा कब्जा मागितलेला नाही. सकृतदर्शनी सदर stallion कंपनीचे made in India भारतीय बनावटीचे ३२ रिव्हल्वर IN AHT 1 24 RL 01811 हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. सदरचे रिव्हल्वर कराड शहर पोलीस स्टेशन येथे पडून राहीलेस त्याला गंज चढेल व खराब होईल व वापरण्यास अयोग्य होईल.

६. ***सुंदरभाई वि. स्टेट ऑफ गुजरात,(२००२)१० एसपी. २८३,*** या न्यायनिवाडयात मा. सर्वोच्च न्यायालयाने ''जप्त मुद्देमाल हा योग्य त्या अटी व शर्तीवर लवकरात लवकर परत करणेबाबतचे आदेश करणे न्यायालयांवर बंधनकारक आहे, असे न्यायतत्व मांडले आहे'' तरी योग्य त्या अटीवर जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देणे न्यायाचे आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदाराने रक्कम रुपये १,००,०००/– चे बंधपत्र लिहून दिल्यानंतर खालील अटींवर तपासी अधिकारी यांनी जप्त मुद्देमाल म्हणजेच stallion कंपनीचे made in India भारतीय बनावटीचे ३२ रिव्हल्वर IN AHT 1 24 RL 01811 हे अर्जदाराच्या ताब्यात द्यावे.

अ. अर्जदाराने त्यामध्ये कोणताही अंतर्गत व बाहय फेरबदल करु नये. तसेच कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये.

ब. न्यायालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय त्याची विल्हेवाट लावू नये.

क. न्यायालय आदेश देईल त्यावेळी सदर मुद्देमाल न्यायालया समक्ष हजर करावा.

ड. तपासी अधिकारी यांनी सदर मुद्देमाल परत देताना त्याचा पंचनामा करुन छायाचित्रे काढावीत व ती दोषारोपपत्रासोबत दाखल करावीत.

BOMIDWAR SUDHIR MADHUKAR
Digitally signed by BOMIDWAR SUDHIR MADHUKAR
Date: 2026.06.09 16:56:13 +0530

कराड. (सुधीर एम.बोमीडवार)

दिनांक :– ०९.०६.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कराड. (कोर्ट नं.१)